## नियमीत दिवाणी दावा क्र.५१/२०२१ मधील निशाणी क्र.३३ कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्यातर्फे त्यांच्या विरुध्द निशाणी क्र. ०१ वर पारीत झालेला विना कैफियत/ विना जबाब प्रकरण चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याबाबत प्रतिपक्षास आदेशीत केले आहे. परंतु वादीतर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादीच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत करण्यात आला आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तिवादाकामी वादी व वादीच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावार वादीतर्फे युक्तिवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी या कामी त्यांचा लेखी जबाब/कैफियत दाखल न केल्याने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्याविरुध्द विना कैफियत/विना जबाब चालविण्याबाबतचा आदेश निशाणी क्र. १ वर दिनांक २१/०९/२०२१ रोजी पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ ते ४ तर्फे प्रस्तुतचा अर्ज आज दिनांक २१/१०/२०२१ रोजी दाखल केला आहे. प्रकरणाचे स्वरुप आणि अर्जातील नमुद कारण विचारात घेता माझ्या मते प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना या कामी त्यांची लेखी जबाब दाखल करण्याची संधी देवुन प्रस्तुतचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित ठरेल. त्यामुळे वरील नमूद कारणांचा विचार करता माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाचे व उचित ठरेल. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र.०१ वर दिनांक २१/०९/२०२१ रोजी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या विरुध्द पारीत केलेला

प्रस्तुत दावा विना कैफियत/ विना जबाब चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

स्वाक्षरी/–

दिनांक– २१/१०/२०२१

(पां.लिं. घुले)

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, दारव्हा.